# ANNEXURE –III

**ANNEXURE – III**

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

**Trust Deed/ By laws/Registration Certificate**

**(Trust / Hospital (Bombay Nursing Act)**

**Faculty:-Nursing**

**Name of College / Institute MGM Mother Teresa College of Nursing**

| | | |
|---|---|---|
| **Name of Trust / Society** | **:-** | Mahatma Gandhi Mission Trust |
| **Registration Certificate** | **:-** | **Trust / Society: -**<br>नोंदणीप्रमाणपत्रसंस्थानोंदणीअधिनियम १८६०<br>क्र. महाराष्ट्र ७४-८२नांदेड. दिनांक २०-१२-१९८२<br>**Hospital (Bombay Nursing Act ): -**<br>व्या.आ./औरंगाबाद/४६/११२००/९९दि ३१ ऑगस्ट १९९९. |
| **Name of the College/ Institute (As per First affiliation Letter )** | **:-** | Mahatma Gandhi Mission's<br>Mother Teresa College of Nursing |
| **Address** | **:-** | MGM Campus, N-6, CIDCO, Aurangabad-431003 |
| **Email ID** | **:-** | principalconabad@gmail.com |
| **Telephone / Mobile No. (s)** | **:-** | 0240-6482000 |
| **Website** | **:-** | www.mgmcon.org |
| **College Code** | **:-** | 154103<br>154116 |

Dean/ Principal Stamp & Signature

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

# TRUST REGISTRATION DOCUMENT

| विशेष/प.आ./मुं.सा.वि./५०म.

~~क्रमांक~~

नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/७४-८२ नांदेड

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, महात्मा गांधी मिशन, १२, भाग्य नगर, नांदेड.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्य रीतया नोंदणी करण्यात आली.

तारीख २०।१२।१९८२ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

REGISTRAR OF SOCIETIES MAHARASHTRA

सहायक संस्था निबंधक
संस्थांचे सहायक निबंधक,
औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद
............... विभाग.

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

Duplicate Certificate issued on 16-7-1987.

~~नांदेड~~ विभाग
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
नांदेड उप-विभाग, नांदेड.

औरंगाबाद विभाग

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही महा. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) याअन्वये औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयाच्या नोंद पुस्तकात नोंदण्यात आली आहे.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव ........ महात्मा गांधी मिशन, नांदेड ........

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ........ एफ - ६७४ (नांदेड) ........

श्री कमलकिशोर तानाजीराव कदम ........ यास प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 30-४- १९८३ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सही/- ........

सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
~~नांदेड उप-विभाग, नांदेड.~~
औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद.

Director
MGM's Institute of Management
Aurangabad.

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

क्रमांक : 2381/21
अर्जदाराचे नांव : [illegible]
नकलेचा अर्ज दिनांक : 28/12/21
नक्कल तयार दिनांक : 18/01/22
नक्कल दिल्याचा दिनांक :

# (सुधारीत परिशिष्ट 'ब')

# महात्मा गांधी मिशन

Art 'A'

# १२, भाग्यनगर, नांदेड

# मेमोरंडम ऑफ असोसिएशन

१. संस्थेचे नाव : महात्मा गांधी मिशन

२. संस्थेचे कार्यालय : १२, भाग्यनगर, नांदेड

३. ध्येय व उद्दिष्टे :

१. ग्रामिण भागात आरोग्याच्या मुलभुत सोयी उपलब्ध करून देणे.

२. अद्ययावत सुविधांची इस्पितळे बांधणे, चालवणे व त्यासाठी आवश्यक असा सर्व कर्मचारी वर्ग नेमणे व त्यांचे वेतन अथवा मानधन देणे.

३. वैद्यकिय शिक्षण देणाऱ्या व संशोधन करणाऱ्या संस्था चालवणे.

४. कुटुंब नियोजनाचा प्रसार व प्रचार करणे.

५. नैत्रचिकित्सा, अस्थिचिकित्सा, व तत्सम वैद्यकिय चिकित्सा शिबिरे ग्रामिण भागात भरवुन विशेषज्ञांची सेवा उपलब्ध करून देणे.

६. कुष्ठधाम काढून कुष्ठांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे व त्याचे समाजिक पुनर्वसन करणे.

७. रूग्णवाहिकांची सेवा पुरवणे.

८. संस्थेच्या मालकिच्या इस्पितळांचा, त्यातील सर्व साहित्यांचा व प्रशासकिय व नर्सीग कर्मचारी वर्गाच्या सेवेचा उपयोग वैद्यकिय शिक्षण देणाऱ्या संस्थाना व वैद्यकिय विशेषज्ञांना कार्यकारी मंडळ ठरवील असे सेवा शुल्क घेवुन देणे.

९. संस्थेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी मदत करणाऱ्या राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संस्थाचे सहकार्य व मदत मिळवणे.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग,नांदेड

सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग नांदेड

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

१०.अपंगासाठी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उघडणे, त्यांना आवश्यक अशा कृत्रिम अवयवांचा पुरवठा करणे व त्यांना स्वालंबी करणे.

११.ब्लड बँक किडनी बँक आय बँक स्किन बँक इत्यादी काढुन दात्यांनी दिलेल्या अवयवांची जपणुक करून गरजवंताना ते देण्याची व्यवस्था करणे.

१२.वैद्यकिय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन साठी वैद्यकिय महाविद्यालयांची स्थापना करणे व चालवणे त्यासाठी आवश्यक त्या पायाभुत सोयी उपलब्ध करून देणे.

१३.दंतवैद्यक शिक्षण, प्रशिक्षण व संशोधना साठी दंतवैद्यक महाविद्यालयांची (डेन्टल कॉलेज) स्थापना करणे व चालविणे. त्यासाठी आवश्यक अशा पायाभूत सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे.

१४.शुश्रुषा विषयक शिक्षण, प्रशिक्षण व संशोधनासाठी शुश्रुचा विद्यालये व महाविद्यालयांची ( Nursing School and Nursing colleges) स्थापना करणे व चालविणे, त्यासाठी आवश्यक अशा सोयी व सुविधा उपलब्द करून देणे.

भौतिकोपचार (Physiotheraphy) व्यावसायिक उपचार (Occupational Therapy) श्रवण व भाष्य उपचार (Audio and Speech Therapy) व इतर पॅरामेडीकल अभ्यासक्रमाची विद्यालये, महाविद्यालये यांची स्थापना करणे व चालविणे त्याकरीता आवश्यक त्या पायाभुत सोयी व सुविधा उपलब्द करून देणे.

१५.स्त्रियांसाठी स्वतंत्र वैद्यकिय महाविद्यालये, दंतवैद्यक महाविद्यालये, शुश्रुषा विद्यालये व महाविद्यालये, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालये, भौतिकोपचार महाविद्यालये, व्यवस्थापन शास्त्र, विधी, वास्तुशास्त्र व अंतर्गत सजावट, फॅशन डिझाईन व कॉसमॅटोलॉजी व तत्सम व्यावसयिक

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची स्थापना करणे व चालविणे, स्त्रियांना शिक्षण प्रशिक्षण द्वारे स्वावलंबी, सक्षम व सबळ (Women Empowerment) करण्यासाठी रोजगारभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे व चालविणे.

१६. शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन करण्यास शिष्यवृत्या देणे.

१७.अर्धवेळ अथवा पुर्ण वेळ काम करून शिक्षण अथवा प्रशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांसाठी विद्यालये, महाविद्यालये व वस्तीगृहे चालविणे.

१८.समाज शिक्षण व प्रबोधनासाठी वाचनालये उघडणे, नियतकालिके चालविणे, व्याख्यानमाला आयोजित करणे व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या शिक्षणविषयक विचारांचा प्रसार व प्रचार करणे.

१९.संस्थेच्या उद्दिष्टपुर्तीसाठी राष्ट्रीयकृत बँक, जागतिक बँक शेडयुल्ड बँक, परदेशी बँक, परदेशी अर्थपुरवठा संस्था, सहकार बँक तसेच सरकारी निमसरकारी व सहाकारी आर्थिक महामंडळे व पतपुरवठा संस्था किंवा खाजगी व्यक्ती किंवा अर्थपुरवठा संस्थाकडुन संस्थेची स्थावर किंवा जंगम मालमत्ता तारण ठेऊन किंवा त्या शिवाय उपलब्ध असलेल्या सर्व वैद्य मार्गा नी कर्जाची उभारणी करणे, बँक गॅरंटी मिळवणे, लेटर ऑफ क्रेडीट मिळवणे इत्यादी, वरील उद्देशपूर्तीसाठी कार्यकारी मंडळाच्या परवानगीने एक किंवा अधिक कार्यकारिणी सदस्यास मालमत्ता, जमीन खरेदी / लीज, बँक कर्ज घेणे बाबतच्या सर्व कायदेशिर कागदांवर (Security, Mortgage Registration, Agreement, Lease deed, MOU) सही करण्यासाठी अधिकार देण्यात येतील.

२०. संस्थेच्या उद्दिष्टपुर्तीसाठी लागणारा निधी व साधन शासकीय, निंमशासकिय सहकारी संस्था, धर्मादाय संस्था, विकास संस्था, औद्योगिक संस्था, अर्थिक

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

महामंडळे पतपुरवठा संस्था, राष्टीय व जागतिक आरोग्य संघटना व मदत संस्था, खाजगी व्यक्ती किंवा अर्थपुरवंठा संस्था व बिझनेस हाऊसेस यांच्याकडुन देणग्या, अनुदान, बक्षीस, कर्ज रूपाने व इतर सर्व वैद्य मार्गाने मिळवणे.

२१. संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक असलेले अधुनिकत तंत्रज्ञान, संशोधन तसेच आधनिक उपकरणे, यंत्रे, औषधे, अवजारे, इत्यादी आयात करणे.

२२. संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्थावर व जंगम मालमत्ता निर्माण करणे, तिचे परिरक्षण करणे आवश्यक तेव्हा तिची विक्री करणे, लिजवर देणे किंवा लिजवर घेणे, भाडेपट्टीवर देणे किंवा घेणे, संस्थेकडे असलेली जमीन व मालमत्ता संस्थेच्या उद्दिष्टपुतइसाठी विकसित करून विकणे.

२३. संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी परदेशातुन निधी व साधन सामुग्री मिळवणे व त्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इडिंयाच्या परवानगीने परदेशात संस्थेचे बँकेत खाते उघडणे.

२४. पर्यावरणासंबंधी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करणे व चालविणे. निसर्ग संतुलनाचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी वनीकरण, फलोद्याने व उद्याने विकसित करण्याचे प्रकल्प हाती घेणे, त्यासाठी आवश्यक असलेल्या रोपवाटिका तयार करणे, हवा व पाण्याचे प्रदुषण थांबविण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेवुन सर्व ते प्रयत्न करणे, जमीन व पाणी यांचा योग्य वापर व्हावा यासाठी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करणे व चालविणे.

२५. क्रिडाविषयक शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी शारिरिक शिक्षण विद्यालये, महाविद्यालये व क्रिडा प्रबोधिनींची स्थापना करणे, उत्कृष्ट खेळाडु निर्माण करण्यासाठी प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे, त्यासाठी क्रिडास्पर्धा

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL

आयोजित करणे, क्रिडा संकुले निर्माण करणे, क्रिडांगणे विकसित करणे, गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके व शिष्यवृत्या देणे. क्रिडाविषयक नैपुण्य निर्माण करण्यासाठी क्रिडा शिक्षण व प्रशिक्षणाचे प्रकल्प हाती घेणे. स्पोर्टस होस्टेल बांधणे व चालवणे.

२६.पर्यटनाविषयक शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची स्थापना करणे, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभुत सुविधा उपलब्ध करून देणे, युवकांतील साहसवृती जोपसण्यासाठी फ्लाईंग ॲण्ड ग्लायडींग स्कुल, माऊंटेनियरिंग ॲण्ड ट्रेकींग स्कूल, बोटींग ॲण्ड सर्फिंग स्कुल व तत्समची स्थापना करणे व त्या संबंधी शिक्षण व प्रशिक्षणाचे प्रकल्प हाती घेणे, त्यासाठी आर्थिक मदत व साधन सामुग्री पुरवणे, होतकरू युवक व युवतींना देणे, युथ हॉस्टेल ची स्थापना करणे व चालवणे.

२७.संगीत,चित्रकला, शिल्पकला, नृत्य, नाटय, साहित्य, चलतचित्र, लोककला अभिनय व इतर सर्व अभिजात कलांचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी विद्यालये, महाविद्यालये व प्रबोधिनीची स्थापना करणे, गुरू शिष्य परंपरेद्वारे कलाशिक्षण देण्यासाठी गुरूकलांची स्थापना करणे व चालविणे, गुणी कलांवताना मानधन देणे त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे, कलावंताच्या उत्कृष्ट कलाकृतीस पारितोषिके देणे, नवोदित कलाकारांसाठी प्रशिक्षण केंद्र चालविणे, वरील सर्व माध्यमातून अभिजात ललित कला शिक्षण व प्रशिक्षणांचे उद्दिष्ट साध्य करणे.

२८. कला, विज्ञान, वाणिज्य, कृषी विज्ञान, व्यावस्थापन शास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र, ट्रॅव्हल ॲड टुरीझंम, फॅशन डिझाईनींग, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरीग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र व अंतर्गत सजावट, जरनॅलीझम ॲण्ड मास कम्युनिकेशन, मिडीयासायन्स, लायब्ररव इन्फरमेशन सायन्स, मेडीकल,

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
[illegible] MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
[illegible], CIDCO, Aurangabad.

पॅरामेडीकल, नर्सिंग, डेंटल, फार्मसी, होमिओपॅथी, आयुर्वेद नॅचरोपॅथी, अभिजातकला, विधी या व इतर सर्व विद्याशाखातील आणि सर्व स्तरावरील शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन करण्यासाठी पदवी व पदव्युत्तर संस्थाची स्थापना करणे व चालविणे, समाजोपयोगी संशोधनाचे प्रकल्पहाती घेणे, त्यासाठी आवश्यकती अर्थिक मदत करणे, अशा प्रकल्पासाठी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संस्थाकडुन सहकार्य मिळविणे व संयुक्त शैक्षणिक प्रकल्पाची उभारणी करणे.

२९.शिक्षक संशोधक व होतकरू विद्यार्थ्यांना देशात व परदेशात शिक्षण, प्रशिक्षण व संशोधनासाठी शिष्यवृत्या व कर्जावु शिष्यवृत्या देणे.

३०.मानवविकासाचे प्रकल्प हाती घेऊन रोजगार संधी उपलब्ध करून देणे. त्यासाठी आवश्यकती प्रशिक्षण केंद्रे उघडणे.युवकामध्ये आवश्यकते उत्पादन कैशल्य प्रात्यक्षिकाद्वारे निर्माण करण्यासाठी उत्पादन केंद्रे उघडणे व चालवणे. या केंद्रातील मालास ना नफा तोटा या तत्वावर देशात व परदेशात बाजार पेठ उपलब्द करूण देणे.शिक्षण व प्रशिक्षण द्वारे मानव विकासाचे उदिष्ट साध्य करणे.

३१. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वनस्पती, पशु, पक्षी व सजीव सृष्टींचे संरक्षण करणे, त्यासाठी आवश्यकत्या पायाभुत सोयी उपलब्द करून देणे व तत्संबंधीचे शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची स्थापना करणे.

३२. शिक्षण सेवेच्या जागतिकीकरणामुळे उत्कृष्ट शिक्षण देण्यांचे संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशात व विदेशात संस्थेच्या शाखा उघडणे विदेशी विद्यालये महाविद्यालये व विद्यापीठाशी सहकार्याचे करार करून विदेशी पदवी, पद्व्युतर व प्रमाणंपत्राच्या अभ्यासक्रमाची सुविधा देशात उपलब्ध करून देणे. तसेच संस्थेतर्फे विदेशात सर्व स्तरावरील शिक्षण देणारी

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

विद्यालये, महाविद्यालये, प्रबोधीनी व विद्यापिठांची स्थापना करणे विदेशातील विद्यार्थ्यांना देशातील संस्थेच्या शिक्षण संस्थात प्रवेश देणे हे विश्वाची माझे घर हे ज्ञानदेवांचे स्वप्न शिक्षण क्षेत्रात साकार करणे.

३३.लोकोपयोगी विशेषतः वैद्यकिय व शैक्षणिक स्वरूपाचे कार्यक्रम राबवण्यासाठी शासकीय, निमशासकीय, धर्मादाय संस्था व या क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संस्थाना मदत करणे अथवा त्यांची मदत घेणे.

३४ नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्ती प्रसंगी करावयाच्या व्यवस्थापनाचे शिक्षण व प्रशिक्षण देणे पुर, वादळ, आग, वणवा, भुंकम्प, ज्वालामुखी, दुष्काळ, साथीचे रोग, अपघात, युध्द, अतिरेकी कारवाया वा तत्सम नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीग्रस्तांना आर्थिक व साधनसामुग्रीची मदत करणे. त्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वतोपरी मदत करणे.

३५. खादीचा प्रचार व प्रसार करणे व त्यासाठी चालना देणे.

३६. कार्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी (Corporate Social Responsibility Fund) मार्फत विविध सामाजिक प्रकल्प राबविणे.

३७.योगा व निसर्गोपचाराचे शिक्षण, प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करणे, योगा व निसर्गोपचार केंद्र स्थापन करणे व त्यासाठी आवश्यक ती मदत करणे.

३८. केंद्र सरकारच्या अर्थ सहाय्यित अर्थ सहाय्य, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी याद्वारे औषध विज्ञान, तंत्रज्ञान अभियांत्रिकी या क्षेत्रातील उबवणपात्र (Incubators) किंवा संशोधन, आणि विकास प्रकल्प किंवा नवनिर्मीतीस प्रोत्साहीत करणे, प्रोत्साहन देणे, योगदान देणे, निधी

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad

स्विकारणे/तयार करणे, मदत करणे किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा केंद्र सरकारची कोणतिही संस्था (Agency) किंवा इतर कोणतिही व्यक्ती किंवा कंपनी किंवा कंपन्या, कॉर्पोरेट बॉडी कॉर्पोरेट्स किंवा इतर ज्यांचा समावेश आहे किंवा अशा कोणत्याही अटी व शर्तीवर किंवा त्यापैकी एकाकडून देणग्या किंवा योगदानाद्वारे किंवा आर्थिक सहाय्याने किंवा कार्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी (CSR), मदत किंवा रोख स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे किंवा कोणत्याही मार्गाने मिळणारी मदत याद्वारे संस्थेच्या उद्देशावर त्याचा विनीयोग करणे.

४.कार्यकारी मंडळ :

संस्थेचे कार्यकारी मंडळ खालील प्रमाणे असेल, त्यांची नांवे व पत्ते दिलेले आहेत व संस्थेच्या नियम व नियमावली संस्थेचा कारभार पहाण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

| अ.क्र | नाव | हुद्दा | वय | धंदा | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.कमलकिशोर नानासाहेब कदम | अध्यक्ष | ३७ वर्ष | इंजीनियर | १२, भाग्यनगर, नांदेड |
| २ | डॉ.पांडुरंगराव माधवराव जाधव | उपाध्यक्ष | ३८ वर्ष | डॉक्टर | मु.पो.उमरदरी,ता.मुखेड.जि.नांदेड |
| ३ | श्री.गंगाधर यशवंतराव पाथ्रीकर | सेक्रेटरी | ३७ वर्ष | प्राध्यापक | २०९,नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |
| ४ | श्री.अंकुशकुमार नानासाहेब कदम | कोषाध्यक्ष | २८ वर्ष | इंजीनियर | १७९ नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |
| ५ | डॉ.सुधीरचंद्र नानासाहेब कदम | सदस्य | २६ वर्ष | डॉक्टर | मु.पो.लिंबगाव ता.जि. नांदेड |
| ६ | डॉ.नितीन नानासाहेब कदम | सदस्य | २५ वर्ष | डॉक्टर | १२, भाग्यनगर, नांदेड |
| ७ | श्री.उज्वलराव नानासाहेब कदम | सदस्य | २८ वर्ष | इंजीनीयर | १७९ नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

५) आम्ही सर्व खालील सही करणारे कार्यकारी मंडळाचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था तयार करण्याची आमची इच्छा असुन या उद्देशाने एकत्र येवुन आम्ही महात्मा गांधी मिशन, नांदेड या नावाची संस्था स्थापन केली असुन ती या कायद्याने नोंद करू इच्छितो म्हणुन या मेमोरंडम ऑफ असोसिएशन वर आज दिनांक ............... रोजी सह्या केल्या आहेत. या नावाची दुसरी संस्था येथे नोंदवलेली नाही.

| अ.क्रं | नाव | सही | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | श्री.कमलकिशोर नानासाहेब कदम | स्वाक्षरीत | १२, भाग्यनगर, नांदेड |
| २ | डॉ.पांडुरंगराव माधवराव जाधव | स्वाक्षरीत | मु.पो.उमरदरी,ता.मुखेड. जि.नांदेड |
| ३ | श्री.गंगाधर यशवंतराव पाथ्रीकर | स्वाक्षरीत | २०९,नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |
| ४ | श्री.अंकुशकुमार नानासाहेब कदम | स्वाक्षरीत | १७९ नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |
| ५ | डॉ.सुधीरचंद्र नानासाहेब कदम | स्वाक्षरीत | मु.पो.लिंबगाव ता.जि. नांदेड |
| ६ | डॉ.नितीन नानासाहेब कदम | स्वाक्षरीत | १२, भाग्यनगर, नांदेड |
| ७ | श्री.उज्वलराव नानासाहेब कदम | स्वाक्षरीत | १७९ नंदवन कॉलनी, छावणी औरंगाबाद |

वरील सभासदांना आम्ही ओळखतो त्यांनी आमच्या समक्ष सहया केल्या आहेत.

नाव पत्ता

स्वाक्षरीत

१. ( इंग्रजीत ) एस.के. कदम ॲडव्होकेट हायकोर्ट (इंग्रजीत) द्वारा विजय बोराडे एस.बी.कॉलेज संमोर, औरंगाबाद

स्वाक्षरीत

२. (इंग्रजीत) विजयसिंग बी देशमुख ६४, गणेश नगर, नांदेड.(इंग्रजीत)

स्थळ : नांदेड

दिनांक: १०.१२.१९८२

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

# (सुधारीत परिशिष्ट 'क')

# महात्मा गांधी मिशन

## १२, भाग्यनगर, नांदेड

### रूल्स ॲण्ड रेग्युलेशन्स

### नियम व अटी

१) संस्थेचे नांव :-महात्मा गांधी मिशन, नांदेड

२) संस्थेचा पत्ता :-१२, भाग्यनगर, नांदेड.

३) हिशोबाचे वर्ष :- संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असेल.

४) संस्थेचे सभासदत्व :-

संस्थेचेउद्देश तसेच घटना अटी व नियम मान्य असलेल्या व आठरा वर्षावरील कोणाही व्यक्तीस संस्थेचे खालील पैकी कोणत्याही प्रकारचे सभासद होता येईल व त्यास कार्यकारी मंडळाची मंजूरी लागेल.

अ) आश्रयदाते :-
एकाचवेळी रूपये १००१ किंवा अधीक रक्कम देणाऱ्या व्यक्तिस संस्थेचे आश्रयदाते सभासद होता येईल.

ब) अजीव सभासद :-
एकाच वेळी रूपये ५०१ किंवा अधिक रक्कम देणाऱ्या व्यक्तिस संस्थेचे अजीव सभासद होता येईल.

क) सभासद :-
वार्षिक रूपये १०१ देणाऱ्या व्यक्तिस वर्गणीदार सभासद होता येईल.

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

<u>५) सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्या :-</u>

अ) संस्थेचा विकास व उत्कर्षासाठी सभासद सतत झटत राहील.

ब) सभासद आपले वर्गणी शुल्क संस्थेकडे वेळेवर दाखल करील.

क) संस्थेच्या कोणत्याही सभासदाची हालचाल संस्थेस बाधक असेल किंवा संस्थेच्या ध्येय व धोरणाचे उल्लंघन होत असेल तर त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार आपल्याकडे कार्यकारी मंडळ राखून ठेवील व बहुमताने सदस्यास निलंबीत करता येईल.

<u>६) सर्वसाधारण सभा :-</u>

संस्थेची सर्व साधारण सभा कलम ४ मध्ये दर्शविलेल्या तीन प्रकारच्या सभासदांची असेल.

अ) संस्थेची सर्व साधारण सभेची बैठक वर्षातून एक वेळेसे घेतली जाईल.

ब) सर्व प्रकारच्या सभासदांना प्रत्येकी एकच मत देण्याचा अधिकार असेल.

क) सर्व साधारण सभेने घेतलेले निर्णय हे अंतिम निर्णय असतील.

ड) संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा अहवाल मागील सभेचा वृत्तांत, अंदाजपत्रक व हिशोबाचे जमाखर्च पत्रके सभेपुढे वाचुन दाखविण्यात येतील.

इ) सभेची सुचना आठ दिवस आगोदर दिली जाईल व त्यात सभेची वेळ, दिनांक, स्थळ व विषयांचा उल्लेख असेल. कोणत्याही ईप्रणालीद्वारे (ई-मेल, व्हॉट्सॲप, इ.) दिलेली सुचना ही वैध असेल.

फ) सभेस सभासदांच्या १/३ (अंश) किंवा १५ हया मध्ये जी संख्या कमी असेल ती सभेची गणपुर्ती (कोरम) समजली जाईल.

ग) सभेपुढे कोणताही विषय ठेवावयाचा असल्यास, कमीत कमी सभेच्या तीन दिवस अगोदर सेक्रेटरीकडे लेखी सुचना द्यावी लागेल. म्हणजे त्यावर सभेत विचार केला जाईल.

म) कोणत्याही विषयावरील निकाल बहुमताने घेतला जाईल व मते बरोबर झाल्यास अध्यक्षास एक खास मत ''कास्टींग वोट'' राहील.

र) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड दर पांच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत केली जाईल. निवडून आलेल्या सभासदातून पदाधिकाऱ्यांची निवड कार्यकारी मंडळात केली जाईल.

अध्यक्ष    सचिव    कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

न) कार्यकारी मंडळ व्यवस्थित काम करीत नसेल तर कार्यकारी मंडळ बरखास्त करण्याचा अधिकरर सर्वसाधारण सभेस असेल. कार्यकारी मंडळ बरखास्त केल्यानंतर कार्यकारी मंडळाची निवडणुक ६ महिन्याच्या आत होईल तो पर्यन्त अध्यक्ष कारभार पाहतील. अशावेळी कार्यकारीणीचे अधिकार अध्यक्षास राहतील.

प) संस्थेचे अध्यक्ष हेच सर्व साधारण सभेचे अध्यक्ष असतील.

छ) कार्यकारी मंडळाचे सभासदांची संख्या वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार सर्व साधारण सभेस राहील.

<u>७) कार्यकारी मंडळ</u> :-

कार्यकारी मंडळाचे एकूण सात सभासद असतील त्यात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक सेक्रेटरी व एक कोषाध्यक्ष व बाकीचे सदस्य असतील.

अ) कार्यकारी मंडळाची निवड ६ (र) प्रमाणे सर्व साधारण सभेत करण्यात येईल. ही निवड प्रत्येक पाच वर्षानी करण्यात येईल.

ब) बदली, मृत्यू किंवा राजीनामा यामुळे रिकामी झालेली जागा, कार्यकारी मंडळातील इतर सभासद बहुमताने भरून काढतील.

क) कार्यकारी मंडळाच्या सभेचा कोरम १/३ किंवा ४ सभासदांचा असेल. कोरम अभावी स्थगीत झालेली सभा पुन्हा बोलाविण्याचा अधिकार अध्यक्षास राहील व त्यावेळी कोरम अट लागु होणार नाही.

ड) सम प्रमाणात मतदान झाल्यास अध्यक्षास एक जादा निर्णायक मत "कास्टवोट" देता येईल.

इ) कार्यकारी मंडळाची बैठक कमीत कमी ३ महिन्यातुन एकवेळा घेतली जाईल.

<u>८) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य</u> :-

अ) संस्थेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून सर्व साधारण सभेची मान्यता घेणे व त्यानुसार खर्च करणे.

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

ब) त्री मासिक खर्चाचे हिशोब पत्रके कार्यकारी मंळाच्या सभेत देऊन वेळोवेळी त्यास मान्यता घेणे.

क) संस्थेच्या कार्यासाठी निधी, वर्गणी, देणग्या, ग्रॅन्ट इ. मिळविण्यासाठी सतत प्रयत्न करणे व मिळविणे तसेच स्थावर व जंगम मालमत्ता निर्माण करणे आणि त्याचा योग्य कामासाठी विनीयोग करणे.

ड) संस्थेस लागणारी जमीन व इमारती व इतर मालमत्ता भाडेपटटीवर, लिजवर किंवा विकत घेणे व त्याची दुरूस्ती व परिक्षण करणे.

इ) नवीन झालेल्या सभासदाचे सदस्यास मंजूरी देणे.

प) संस्थेचे कार्य चालविण्यासाठी नोकर वर्गाची नेमणूक, पगार तसेच नोकरी वरून काढण्याचे इत्यादी अधिकार असतील.

ग) संस्थेचे हिशोब पत्रके तपासण्यासाठी ऑडीटरची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

य) वरील उद्दीष्टपुर्ती साठी आवश्यक व योग्य त्या सर्व मार्गानी स्थावर मालमत्ता निर्माण करणे व आवश्यकतेप्रमाणे तिचा उपयोग करणे.

र) शासनातर्फे, व्यक्तीगत किंवा निमशासकीय किंवा धर्मादाय संस्थातर्फे, अनुदान देणग्या इतयादीच्या स्वरूपात निधी जमा करणे.

<u>९) अध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये</u> :-

१) अध्यक्ष संस्थेच्या सर्व साधारण सभेचे व कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारतील व सभा चालवतील.

२) संस्थेच्या ध्येयपुर्तीसाठी व विकासासाठी नवीन योजना तयार करून त्या यशस्वीपणे पार पाडणे.

३) संस्थेच्या सर्व व्यवहारावर नियंत्रण ठेवणे व देखरेख करणे.

अध्यक्ष    सचिव    कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

**१०) उपाध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये :-**

अध्यक्षांच्या गैर हाजरीत सभाचे अध्यक्षस्थान स्विकारणे व सभा चालविणे तसेच अशा वेळी अध्यक्षास असलेले सर्व अधिकार उपाध्यक्षास राहतील.

**११) सेक्रेटरीचे अधिकार व कर्तव्ये :-**

१) संस्थेच्या सर्व सभा अध्यक्षांच्य सुचने वरून कलम ६ 'इ' प्रमाणे बोलावणे व त्यात सभेचे विषय व इतर माहिती ठेवणे.

२) संस्थेशी संबंधीत किंवा सरकारी निम सरकारी व इतर व्यक्तिशी जरूर तो पत्रव्यवहार करणे.

३) संस्थेच्या सर्व सभाचे कार्याचा वृत्तांत व ठरावाची योग्य ती नोंद घेणे व ते रजिस्टर मध्ये लिहुन ठेवणे व झालेल्या ठरावाची अमलबजावणी करणे.

४) संस्थेचे वार्षिक अंदाज पत्रक अहवाल व जमा खर्च पत्रके तयार करून ते सभेपुढे ठेवणे.

५) संस्थेच्या ऑडीटचे सर्व कागदपत्रे रेकॉर्ड तयार करून ठेवणे व ऑडीट दाखविण्याची जबाबदारी त्याचे वर असेल.

**१२) कोषाध्यक्षांचे अधिकार व कर्तव्य :-**

१) संस्थेचे हिशोब ठेवण्याची, लिहीण्याची जबाबदारी कोषाध्यक्षांवर राहील.

२) अध्यक्ष व सेक्रेटरी यांचे लेखी सुचने प्रमाणे रक्कम देणे व वसुल झालेल्या रक्कमा जमा करणे. व त्या बाबत पावती देणे त्यावर त्याची सही असेल व त्यास तेच जबाबदार असतील.

३) दैनंदीन व्यवहारासाठी रूपये ५००/-(पाचशे) पर्यन्त शिल्लक ठेवणे जादा शिल्लक संस्थेच्या नांवाने बॅंकेत खाते उघडणे त्यात जमा ठेवणे स्वतःजवळ ठेवु नये.

४) अंदाज पत्रक, ॲडीट, जमाखर्च पत्रके तयार करणे व ते तयार करण्यासाठी मदत करणे.

अध्यक्ष　　　सचिव　　　कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

१३) हिशोब तपासणी :-

प्रतिवर्षी संस्थेचे हिशोब तयार करून त्याचे ऑडीट करून घेणे ऑडीटरची नेमणुक कार्यकारी मंडळ करेल, ऑडीट झाल्यानंतर ती पत्रके मंजुरीसाठी सभेत ठेवणे, हिशोब तयार करून ऑडीट करून घेण्याची जबाबदारी सेक्रेटरी व कोषाध्यक्षांवर राहील.

१४) मालमत्ता :-

संस्थेस मिळणारी वर्गणी, देणग्या, अनुदान इ. हे सर्व मालमत्तेस जमा होईल त्यातून संस्थेस त्यावर किंवा संस्था चालविण्यास आवश्यक असणारी जंगम मालमत्ता विकत घेता यईल परंतु या साठी कार्यकारी मंडळाची सभेची मान्यता घेणे आवश्यक असेल.

संस्थेच्यास नावाने बॅंकेत खाते उघडण्यात यावे व ते चालविण्याचा अधिकार संस्थेचे अध्यक्ष, सेक्रेटरी व कोषाध्यक्ष या तिघापैकी अध्यक्ष, सेक्रेटरी किंवा कोषाध्यक्ष या पैकी या दोघाचे सहीने असेल. संस्थेच्या सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ते बाबत कार्यकारी मंडळाचा प्रत्येक सभासद व्यक्तिगत व सामुदायीक रित्या जबाबदार राहील.

१५) नियमात बदल करण्याची तरतुद :-

वरील नियमात बदल करावयाचा असल्यास त्यास सर्व साधारण सभेत ठराव ठेऊन ३/५ मतांनी तो मंजुर करावा लागेल व मंजुर झाल्यानंतर आवश्यक ते नवीन नियम करून घेता येतील व नंतरच ते आमलात येतील.

१६) संस्थेचे समाप्तीकरण/विसर्जन (Dissolution) :-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ मधील तरतुदीला अनुसरून संस्थेचे विसर्जन ३/५ सभासदांच्या बहुमताने करता येईल. संस्थेचे सर्व देणे पूर्ण केल्या नंतर शिल्लक राहणारी संपत्ती संस्थेचे विसर्जन झाल्यास विसर्जनाच्या तारखेप्रमाणे उर्वरित

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

मालमत्ता समउद्देशीय संस्थेकडे हस्तांतरित केली जातील, धर्मादाय आयुक्त/ न्यायालय/ इतर कोणत्याही कायद्याच्या परवानगीने हे हस्तांतरण केले जाईल.

**१७) संस्थेच्या नावात बदल करणे :-**

संस्थेच्या उद्देशात बदल करणे किंवा संस्थेचे अंशतः/पूर्णतः दुसऱ्या संस्थेत विलीनीकरण करणे आवश्यक झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१८) संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ च्य नियम १५ प्रमाणे सदरहु नियमातील अनुसूची ६ या नमुण्यात संस्थेच्या सभासदांची यादी ठेवण्यात येईल.

**१९) अपरिहार्य (Irrevocable):-**

या करारनामाच्या अटी आणि तरतुदीद्वारे तयार केलेली संस्था अपरिहार्य (Irrevocable) आहे.

**२०) लाभार्थी (Beneficiaries):-**

या कलमाद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, जनतेचा मोठया प्रमाणावरील भाग हे संस्थेचे लाभार्थी असतील आणि कोणताही वैयक्तिक प्रवर्ग, जात, पंथ, धर्म विचारात न घेता लाभार्थी असेल.

**२१) संस्थेचा निधी (Fund/Property):-**

संस्थेचा निधी/ मालमत्तेचा विनियोग केवळ संस्थेच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन मधे नमुद केलेल्या उद्देशासाठीच करण्यात येईल. संस्थेचा निधी/मालमत्ता ही व्यक्ति विशेषासाठी वापरली जाणार नाही. तसेच संस्थेचे सदस्य/संचालक/संस्थापक/पदाधिकारी ;सद्या, पूर्ववत किंवा भविष्यात येणारेद्ध यांच्या हितासाठी सुध्दा वापरला जाणार नाही.

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

**२२) अवशिष्ट(Residuary) :-**

संस्थेस संस्था नोंदणी अधिनियम १८६०,महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा, १९५० व भारतीय ट्रस्ट कायदा आणि प्राप्तिकर अधिनियम १९६१ मधील तरतुदी आणि त्या अंतर्गत बनविलेले नियम त्यानुसार संस्थेस लागु होतील.

**२३)संस्थेचे उद्देश (Object of the Trust):-**

संस्थेचे उद्देश हे शैक्षणिक, वैद्यकिय, सांस्कृतिक आणि सार्वजनिक उपयुक्तते साठीचे आहेत.

आम्ही : महात्मा गांधी मिशन तालुका व जिल्हा नांदेड ची घटना नियम व अटी संबंधी खालील सही करणारे असे शपथपूर्वक सांगतो की, वरील घटना व नियम व अटी याची ही खरी प्रत आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.कमलकिशोर नानासाहेब कदम | स्वाक्षरीत |
| २) श्री.गंगाधर यशवंतराव पाथ्रीकर | स्वाक्षरीत |
| ३) श्री.अंकुशकुमार कदम | स्वाक्षरीत |
| ४) डॉ. पांडुरंगराव माधवराव जाधव | स्वाक्षरीत |
| ५) डॉ.सुधिरचंद्र नानासाहेब कदम | स्वाक्षरीत |
| ६) डॉ.नितीन नानासाहेब कदम | स्वाक्षरीत |
| ७) श्री.उज्वलराव नानासाहेब कदम | स्वाक्षरीत |

साक्षीदार :

| | |
|---|---|
| १) एस.के.कदम | स्वाक्षरीत |
| २) विजयसींग बी. देशमुख | स्वाक्षरीत |

ठिकाण :- नांदेड

दिनांक :-१०.१२.१९८२

अध्यक्ष  सचिव  कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

<u>दाखला</u>

असा दाखला देण्यात येतो की महात्मा गांधी मिशन नांदेड या संस्थेचे नियम व निर्बधांची खरी व बरोबर प्रत आहे.

दिनांक :-१०.१२.१९८२

| नांव | सही |
|---|---|
| अध्यक्ष : श्री.कमलकिशोर नानासाहेब कदम | स्वाक्षरीत |
| उपाध्यक्ष : डॉ. पांडुरंगराव माधवराव जाधव | स्वाक्षरीत |
| सचिव : श्री.गंगाधर यशवंतराव पाथ्रीकर | स्वाक्षरीत |

Copy write by
Copy Read by
Copy Compare by

"प्रमाणित सत्यप्रत"

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग.नांदेड

अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

Mahatma Gandhi Mission's
**Medical College & Hospital**
N-6 CIDCO, Aurangabad - 431 003. Maharashtra
Tel.: 0240 6482000

MGM/MCH/2022/ 972

Date: 22/3 /2022

To,
Health Officer,
Health Department .
Municipal Corporation Aurangabad.

Sub : Renewal of Registration Under Section 5 of Bombay Nursing Home Registration Act-1949.

Ref : Certificate of Registration to MGM Hospital N-6, CIDCO , **Valid till 31st March.2022.**

Sir,

With reference to above I have to inform as follows. Form 'B' along with necessary enclosures for renewal of Registration is being submitted.

**Please do needful.**

M.G.M.'S Medical College Abad

**Dean**
MGM'S Medical College & Hospital
N-6, Cidco, Aurangabad

O/C
22/3/22

**Enclosures:** 127 Pages .

23/3/2022

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

Scanned with CamScanner

# HOSPITAL REGISTRATION DOCUMENT

Municipal Corporation Aurangabad

(Health Dept.)

# Certificate of Registration

Under Section 5 of the

Bombay Nursing Homes Registration Act, 1949

**FORM 'C' (Under Rule 5)**

945

This is to certify that Shri / Shrimati Dr. Rajendra Brijmohan Bohra

has been registered under the Bombay Nursing Homes Registration Act, 1949

in respect of Name of Nursing Home Mahatma Gandhi Mission's Medical Collage & Hospital

situated at N-6, Cidco, Aurangabad

and has been authorised to carry on the said Nursing Home.

Registration No. 552 Maternity 90 Cots

Date of Registration 01/7/2005

Date of Issue 9/8/19 Other Nursing Patients 747 Cots

This Certificate shall be valid upto 31st March 2022

Padalkar 9/8/19

Medical Officer of Health

Municipal Corporation, Aurangabad

31/8

PRINCIPAL

MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING

N-6, CIDCO, Aurangabad.

Mahatma Gandhi Mission's
**Medical College & Hospital**
N-6 CIDCO, Aurangabad - 431 003. Maharashtra
Tel.: 0240 6482000

MGM/MCH/2022/ 972

Date: 22/3 /2022

To,

Health Officer,
Health Department .
Municipal Corporation Aurangabad.

Sub : Renewal of Registration Under Section 5 of Bombay Nursing Home Registration Act-1949.

Ref : Certificate of Registration to MGM Hospital N-6, CIDCO ,
**Valid till 31st March.2022.**

Sir,

With reference to above I have to inform as follows. Form 'B' along with necessary enclosures for renewal of Registration is being submitted.

**Please do needful.**

Dean
MGM'S Medical College & Hospital
N-6, Cidco, Aurangabad

O/C
22/3/22

Enclosures: 127 Pages .

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad

23/3/2022

Mahatma Gandhi Mission's
**Medical College & Hospital**
N-6 CIDCO, Aurangabad - 431 003. Maharashtra
Tel.: 0240 6482000

MGM/MCH/2022/ 972

Date: 22/3 /2022

To,
Health Officer,
Health Department .
Municipal Corporation Aurangabad.

**Sub :** Renewal of Registration Under Section 5 of Bombay Nursing Home Registration Act-1949.

**Ref :** Certificate of Registration to MGM Hospital N-6, CIDCO , **Valid till 31st March.2022.**

Sir,

With reference to above I have to inform as follows. Form 'B' along with necessary enclosures for renewal of Registration is being submitted.

**Please do needful.**

**Dean**
MGM'S Medical College & Hospital
N-6, Cidco, Aurangabad

O/C 22/3/22

**Enclosures:** 127 Pages .

23/3/2022

PRINCIPAL
MGM'S MOTHER TERESA COLLEGE OF NURSING
N-6, CIDCO, Aurangabad.

Scanned with CamScanner